# चेरी ब्लॉसम



खूप दिवस झाले, झाडे बिचारी उदास, उघडी बोडकी, थंडीत कुडकडत होती. मार्च संपत आला. ऑफिशियल स्प्रिंग सांगून झाला... शाळांना सुट्ट्या देऊन झाल्या..

मग मात्र फुलांनी बंड केले.. सारी बंधन सोडून बाहेर येण्यासाठी गर्दी केली. शाळा सुटल्यावर मुले कशी जागा मिळेल तशी पळत सुटतात? तशी ही फुले एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून सगळीकडून डोकावायला लागली.. " काय चेरी ब्लॉसम फुललाय " असे सर्वांना म्हटल्यावर लाजून जास्तच गुलाबी झाली..

पण पानांना रहावले नाही, फुलांचे कौतुक पहावले नाही... ८ दिवसातच फुलांना खाली ढकलत, रागाने ती लाल होत बाहेर आली. वाऱ्याने आणि पावसाने सुध्दा त्यासाठी मदत केली, हे पाहून वाईट वाटले.

पण फुलांनी राग मानला नाही... त्यांचे मनसोक्त फुलणे आणि आनंद देणे हे काम झाले होते... जाताना सुध्दा अशी छान, सर्वत्र रांगोळी काढत, पायघड्या घालतच ती जायला लागली... हा त्यांचा प्रवास जवळून पहाणे हे अतिशय आनंदी आणि स्फूर्तीदायक होते.

१५ मार्च ते १५ एप्रिल ह्या काळात अनेक ठिकाणी ही फुलं दिसतात.

चेरी ब्लॉसम, ज्याला जपानमध्ये साकुरा म्हंणतात, ते त्यांचे राष्ट्रीय फूल आहे. ते आशेचे प्रतीक समजले जाते. जेमतेम आठवडाभर त्यांचे आयुष्य असते, पण त्यांचे असे भरभरून फुलणे... जीवन सुंदर आहे आणि छोटे असले तरी ते कसे जगावे हे सांगते.



जगभरात अनेक ठिकाणी चेरी ब्लॉसम फेस्टिवल असतात. भारत, पाकिस्तान, चीन, सायबेरिया, जपान, साऊथ कोरिया, पॅरिस, व्हँक्युव्हर, सियाटल, वॉशिंगटन DC, ब्रुकलीन अशा अनेक ठिकाणी साजरे होत असतात. जपानने अमेरिकाला अशी ५०,००० हून जास्त झाडे भेट दिली आहेत.. आता त्याची लाखो झाडे झाली आहेत.

ह्या झाडाच्या ६०० व्हरायटीज आहेत. अनेक रंगछटा आहेत.

आपल्या इथे भारतात हिमालयन चेरी ब्लॉसम फेस्टिवल असतो. शिलाँगला, ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये.. Bird Cherry किंवा Sour cherry ही ह्या झाडांना म्हणतात.
हजारो लोक ती गुलाबी फुले पहायला येतात.
हिंदीमध्ये ह्या झाडांचे नांव पद्मक (Padmak) आहे.
इतरही भाषांमध्ये हे वेगळ्या नावांनी ओळखले जाते.

आयुर्वेदात, काही संस्कृत श्लोकांत ह्या फुलांचा उल्लेख आढळतो, आणि त्याच्या अनेक भागांचा औषध म्हणून वापर करण्यात येतो.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, जम्मू काश्मीर, दार्जीलिंग आणि उत्तरेकडील काही प्रदेशांत, डोंगरावर, देवळांजवळ ही फुलझाडं सापडतात. त्यांना फार पवित्र मानतात आणि विष्णु आणि शंकराच्या पूजेच्या वेळी, महाशिवरात्रीला ह्या झाडांची पानं आणि काही फळं ह्यांची सजावट करतात. दक्षिणेकडे ही निलगिरी घाटात, ब्रिटिशांनी केलेल्या बागेत ही बहरलेली झाडं आपल्याला पहायला मिळतात.



आनंद देणारा हा फुलांचा बहर एकदा तरी पहायलाच हवा.

**......... चित्रा मेहेंदळे**